दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २३६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.२१ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## शिवसेनेकडून सुनील शिंदेंना उमेदवारी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थेमधून येत्या १० डिसेंबर रोजी माजी मंत्री रामदास कदम यांच्या रिक्त होणाऱ्या मुंबईच्या जागेवर शिवसेनेतून वरळीचे माजी आमदार सुनील शिंदे यांच्या नावाची काल रात्री उशिरा घोषणा झाली. शिवसेनापक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी सुनील शिंदे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. विद्यमान आमदार रामदास कदम यांचा पुन्हा संधी देण्याचे शिवसेनेने टाळले आहे. शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी सुनील शिंदे यांच्या उमेदवारीचे समर्थन केले आहे.

संजय राऊत म्हणाले की, सुनील शिंदे हे मागील विधानसभा निवडणुकीपूर्वी विद्यमान आमदार होते. युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर सुनील शिंदे यांनी ही जागा त्यांच्यासाठी सोडली होती. त्याशिवाय, सुनील शिंदे यांनी अनेक वर्ष पक्षासाठी काम केले आहे. त्यांच्या या पक्षकार्याची आणि केलेल्या त्यागाचे स्मरण ठेवून विधान परिषदेसाठी उमेदवारी दिली असल्याचे संजय राऊत यांनी स्पष्ट केले आहे.

# पनवेल महापालिकेचा दिल्लीत गौरव

## देशामध्ये २७ वा तर राज्यामध्ये २ रा नंबर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**स्वच्छ भारत अभियान अंतर्गत संपूर्ण देशभर स्वच्छ सर्वेक्षण २०२१ राबविण्यात आले होते. त्या अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२१, स्वच्छता मित्र सुरक्षा चॅलेंज आणि कचरामुक्त शहरांसाठीचा पुरस्कार आज नवी दिल्लीमधील विज्ञान भवनात स्वच्छ अमृत महोत्सवामध्ये राष्ट्रपती रामनाथ कोविंद, केंद्रीय सचिव दुर्गाशंकर मिश्रा उपस्थितीमध्ये केंद्रीय नागरी विकास व गृहनिर्माण मंत्री हरदीपसिंह पुरी यांच्या हस्ते पनवेल महानगरपालिकेस वितरीत करण्यात आला.**



पनवेल महानगरपालिकेच्यावतीने महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख, उपमहापौर जगदीश गायकवाड, सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, महिला बालकल्याण समितीच्या सभापती मोनिका महानवर, नगरसेवक गणेश कडू, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

याबरोबरीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पनवेल महापालिकेला १ ते १० लोकसंख्येच्या शहरांमध्ये देशांमध्ये २७ वा नंबर मिळाला, तर राज्यामध्ये २ रा नंबर मिळाला आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२१ मध्ये अत्यंत उत्साहाने सहभागी होत यावर्षी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विविध नाविन्यपूर्ण संकल्पना राबविल्या. स्वच्छता आणि पर्यावरण रक्षण–संवर्धनाचे संदेश प्रसारित करणाऱ्या आकर्षक रंगचित्रांनी सजलेली भिंतीचित्रे, शहरातील शौचालये शोधण्यासाठी गुगल मॅपचा वापर, सायकल रॅली, विविध टाकाऊ वस्तूंसाठी रिड्युस, रियुझ, रिसायकल चे स्वच्छता रथ महापालिकेने बनवले आहे. पनवेल महानगरपालिकेच्या लोकप्रतिनीधी, अधिकारी, कर्मचारीवृंदाने व स्वच्छता मित्रांनी केलेले स्वच्छताविषयक काम आणि त्याला नागरिकांचा लाभलेला सकारात्मक प्रतिसाद यामुळेच पनवेल महानगरपालिकेस स्वच्छतेचा हा बहुमान प्राप्त झालेला आहे.

## सिग्नल तोडणाऱ्या वाहनचालकांवर पनवेल वाहतूक विभागाची कारवाई

### गेल्या ५ दिवसात १७२ कारवाया; ११४ लायसन्स निलंबित

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना चाप बसावा यासाठी पनवेल शहरात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. वाहतुकीचे नियम मोडल्यामुळे वाढते अपघातांचे प्रमाण व त्यामुळे होणार जीवितहानी रोखण्यासाठी वाहनचालकांना शिस्त लावणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई वाहतूक विभागाचे उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या सूचनेनुसार पनवेल शहर वाहतूक विभागाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरातील शिवशंभो नाका व नवीन पनवेल सिग्नल याठिकाणी मागील ५ दिवसांपासून सिग्नल जंपिंग ड्राइव्ह सुरू आहे.

पनवेल शहर हे आजूबाजूच्या गावांची मुख्य बाजरपेठ व मध्यवर्ती कार्यालयांचे ठिकाण असल्याने याठिकाणी दररोज परिसरातील नागरिक खरेदीसाठी व इतर कार्यालयीन कामकाजासाठी येत असतात. त्याचबरोबर पुणे, गोवा महामार्ग, उरण, कर्जत, खोपोली आदी ठिकाणी जाण्यासाठी अनेक मार्ग गेलेले असल्याने शहरातील मुख्य रस्त्यावर वाहनांची कायमच वर्दळ असते. शहरातील गार्डन हॉटेल, नवीन पनवेल मार्ग, एचडीएफसी सर्कल, शिवशंभो नाका याठिकाणी सिग्नल असून वाहतूक नियमन करण्यासाठी वाहतूक पोलिस नेमलेले आहेत. तरीही काही बेशिस्त वाहनचालकांकडून सर्रास सिग्नल मोडून वाहने पुढे नेली जातात. यात प्रामुख्याने दुचाकीस्वारांकडून सर्रास सिग्नल जॅम्पिंग केले जात असल्याचे निदर्शनास आले. वाहतूक पोलिस अशा वाहनधारकांवर सातत्याने कारवाई करतात. त्यानंतरही वाहनचालकांमध्ये सुधारणा होत नाही. उलट सिग्नलवर वाहन पुढे नेऊन जीव धोक्यात घालून प्रवास केला जात आहे.



> सर्व वाहनचालकांना आवाहन करण्यात येते की, सर्वांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे. सिग्नल जंपिंग करू नये. काहीजण अतिशय धोकादायक पद्धतीने सिग्नल जम्पिंग करतात, त्यामुळे अनेकदा अपघाताचे प्रसंग घडले आहेत. अनेकजणांनी प्राणही गमावले आहेत. झेब्रा क्रॉसिंगवर वाहने उभी करू नयेत. झेब्रा क्रॉसिंग लाईनच्या मागे गाडी थांबवावी. पादचाऱ्यांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. सिग्नल जंपिंग करणाऱ्या वाहनचालकांचे लायसन्स तीन महिन्यांसाठी रद्द केले जाईल.
>
> **- संजय नाळे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर वाहतूक विभाग)**

मोबाईलवर बोलत, सिग्नल मोडणाऱ्या वाहनचालकांमुळे अनेक अपघाताचे प्रसंग घडलेले आहेत. यामुळे रस्ता ओलांडणाऱ्या अनेकांचा दुर्दैवाने अपघाती मृत्यू झालेला आहे. त्यातच चिंतेची बाब म्हणजे एनएमएमटी बस चालकांमध्ये देखील सिग्नल तोडण्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत. त्याबरोबरीने रिक्षा चालकांकडूनही .../२

## देशातील शेतकरी आंदोलनामुळे मोदी सरकार बॅकफुटवर : महेंद्र घरत

**दै.रायगड नगरी । उरण**

मोदी सरकारने आपल्या कारकिर्दीत देशातील अनेक घटकांना संकटात लोटले. त्यामुळे देशाची आर्थिक स्थिती डबघाईला आली असतानाच देशातील भांडवलदारांना फायदा होणारे तीन कृषी कायदे आणून मोदी सरकारने देशातील शेतीव्यवस्थाच संपवायला आणली.याविरुद्ध शेतकऱ्यांनी उग्र आंदोलन सुरू केले. गेले अकरा महिने आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांपुढे मोदी सरकारला झुकावे लागले असून अखेर शेतकरी वर्गावर अन्याय करणारे काळे कायदे रद्द करावे लागले. ही देशातील शेतकऱ्यांनी केलेली क्रांती असून त्यामुळे मोदी सरकार पूर्णपणे बॅकफूटवर गेले आहे असे स्पष्ट प्रतिपादन रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत यांनी केले आहे.मोदी सरकारने अन्याय्य कृषिकायदे रद्द केल्यावर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

देशातील शेतकरी जगला तर देश जगेल हे सूत्र असतानाच मोदी सरकारने भांडवलदारांच्या हिताचे निर्णय घेऊन देशातील फायद्यात असणारे अनेक उद्योग धंदे खाजगिकरणाच्या नावाने भांडवलदारांच्या घशात घातले.त्यानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतीला भांडवलदारांना दान करण्याचा संकल्प मोदी सरकारने करून शेतकरी विरोधी तीन काळे कायदे मंजूर केले.मात्र देशातील शेतकऱ्यांनी .../२



## संक्षिप्त...

### वृद्ध महिलेला फसवून लाखोंचे दागिने लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका ७० वर्षीय वृद्ध महिलेस फसवून तिच्याकडे असलेले जवळपास १ लाख ८० हजारांचे सोन्याचे दागिने दोन अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना पनवेल शहरातील टपाल नाका येथील शनी मंदिराजवळ असलेल्या रिक्षा स्टँड तसेच बेथल प्रार्थनालया जवळ घडली आहे.

यमुना वास्कर (वय–७०, रा.–कुंडेवहाळ) या चिखले येथे राहणाऱ्या त्यांच्या मुलीस भेटण्यासाठी जात असताना टपालनाका परिसरात दोन अज्ञात इसमांनी त्यांच्याजवळ येऊन तुम्हाला १७०० रू. मिळवून देतो असे सांगून त्यासाठी तुमच्या अंगावर असलेले दागिने काढून पाकिटात ठेवून द्या व सदर पाकीट तुमच्या पिशवीत ठेवा असे सांगून या दोघांपैकी एका इसमाने त्यांना हजार रूपये दिले तसेच पाकीट असलेली पिशवी त्यांच्या हातात दिली व आम्ही लगेच येतो असे सांगून ते निघून गेले. काही वेळाने सदर महिलेने पिशवी तपासली असता त्यात दागिने आढळून आले नाहीत. त्यामुळए आपली फसवणूक लक्षात येताच याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अखेरीस माथेरान मधील ते दहा भाजपवासी नगरसेवक अपात्र घोषीत

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान नगरपालिकेतील दहा नगर–सेवक मा. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानंतर अनहर्त्त ठरविण्यात आल्याने येथील पालिकेतील विविध विषय समितीचे सभापदी, एक स्वीकृत सदस्य व उपनगराध्यक्ष पद रिक्त झाले असून तसे माथेरान नगरपालिकेकडून मा.जिल्हाधिकारी कार्यालयाला सूचित करण्यात आले आहे.

माथेरानच्या राजकारणात उलथापालथ करणारी घटना मे महिन्याच्या अखेरीस घडली होती, माथेरान पालिकेमध्ये सतरा पैकी १४ जागा व नगराध्यक्ष पद जिंकत शिवसेनेने निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले होते त्यासाठी शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी व प्रसाद सावंत यांनी अविरत मेहनत घेतली होती व त्यास माथेरान मधील शिवसेनेच्या निष्ठावंतांनी साथ दिली होती पण कालांतराने काही जणांच्या अति महत्वकांक्षेमुळे ह्या अभेद्य भिंतींना तडे गेले होते व पुन्हा एकदा सत्तेकडे वाटचाल करणाऱ्या शिवसेनेचा वारू घरच्यां घरभेदयांमुळेच रोखला गेला होता आपसातील धुसपुसीचा परिणाम पक्ष फुटीपर्यंत येऊन ठेपला व शिवसेनेचे नऊ व एक स्वीकृत असे दहा नगरसेवक भाजपवासी झाल्याने जिल्ह्यात शिवसेनेला धक्का बसला होता पण ह्या फुटीनंतर ह्या नगरसेवकांना तालुक्यातील एका बड्या नेत्यांची साथ होती अशीही चर्चा सर्वत्र रंगली होती ह्या नगरसेवकांच्या घर वापसीच्या प्रयत्नांमध्ये काही जण खो घालत असल्याचेही नागरिक बोलत होते त्यामुळेच पक्षश्रेष्टींनी पक्षांतर बंदी कायद्या अंतर्गत ह्या नगरसेवकांवर कारवाई करावी व त्यांचे नगरसेवक पद रद्द व्हावे अशी याचिका दाखल केली होती त्यानुसार महाराष्ट्र प्राधिकरण सदस्य अनहर्ता नियम १९८६ मधील कलम ३(१) कडील तरतुदीनुसार व महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनहर्ता नियम १९८७ चा नियम ८(१)नुसार दि २८ ऑक्टोबर रोजी मा. जिल्हाधिकारी रायगड यांच्या न्यायालयासमोर अनहर्त्त घोषित करण्यात आले होते ह्या विरोधात ह्या नगरसेवकांनी मा उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. २९१८/२०२१ दि.१७ जुलैला दाखल केली होती सदर याचिकेत दि.१७ जुलै रोजी आदेश होऊन मा. जिल्हाधिकाऱ्यांनी अनहर्ता बाबत निकाल दिले आहेत निकाल जाहीर झाल्यापासून पुढील तीन आठवड्यापर्यंत सदर निकालास अंमल देता येणार नाही असा आदेश दिला होता त्याची मुदत दि.१८ नोव्हेंबर २०२१रोजीसंपली असल्याने आता माथेरान पालिकेतील विषय समित्या,उपनगराध्यक्ष पद व स्वीकृत सदस्य ही पदे आता रिक्त झाली आहेत.

(पदे रिक्त झालेल्या विषय समित्या) १)आकाश चौधरी उपनगराध्यक्ष तथा स्वच्छता वैदकीय आरोग्य सार्वजनिक पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण समिती, २) प्रतिभा प्रदीप घावरे शिक्षण क्रीडा कला सांस्कृतिक समिती सभापती, ३) खान सबिना गुलमोहम्मद उर्फ सोनम सचिन दाभेकर महिला बालकल्याण समिती सभापती या पदांचा समावेश आहे. ३१ डिसेंबरला संपणार आहे व त्याअगोदरच ह्या नगरसेवकांना अपात्र घोषित केल्याने या पुढील पालिकेच्या सभेची सभासद संख्या कमी होणार असल्याने निर्णय कोणत्या धर्तीवर घेतले जाणार ह्या बाबत स्थानिक नागरिकांमध्ये उत्सुकता आहे.

## १ डिसेंबर रोजी जेएनपीटी बंदरातील मालवाहू जहाजे अडविण्याचा हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांचा इशारा

**दै.रायगड नगरी । उरण**

आशिया खंडातील सर्वात मोठे आधुनिक जेएनपीटी प्रकल्प उरणमध्ये असून प्रकल्प विस्थापितांची समस्या काही सुटत नाही. विस्थापितांची समस्या जैसे थे तसेच आहे. शासनाने जेएनपीटीच्या १७ हेक्टर विकसित जमीनीत पुनर्वसन करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करून जे एन पी टी कडून ११/२/२०२१ रोजी फंड वसूल करून नऊ महिने उलटूनही पुनर्वसनाचे काम चालू करत नसल्याच्या निषेधार्थ १डिसेंबर २०२१ पासून पुनर्वसनाच्या हक्कासाठी उरण मधील घारापुरी ते मोरा परिसरातील मासेमारी करणारे सर्व मच्छिमार कोळी बांधव एकत्र येऊन जे एन पी टी बंदरात समुद्र चॅनेल मधून येणारी मालवाहू जहाजे भर समुद्रात अडविण्याचा इशारा हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी दिला आहे.

हनुमान कोळीवाडाचा पुनर्वसनाचा प्रश्न गेली ३७ वर्षे प्रलंबित आहे.शासनाने जे एन पी टी च्या जसखार सर्वे नंबर २८६,२८८,२८९ मध्ये भराव केलेल्या जमिनीत सन १९८५ च्या शासन निर्णयाने शेवा (हनुमान )कोळीवाडा गावातील ८६ शेतकरी व १७० बिगर शेतकरी अशा २५६ कुटुंबाचे पुनर्वसन करण्याचे जाहीर केलेले आहे.१७ हेक्टर जमिनीत ७ हेक्टर १० आर (७१० गुंठे )जमीन भूखंडासाठी आहे तर उर्वरित बाकी जमीन नागरी सुविधांसाठी आहे.पुनर्वसनाची ही सर्व प्रक्रिया कागदावरच आहे. प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र काहीच नाही. वर्षानुवर्षे हे असेच चालू आहे. पुनर्वसनासाठी १७ हेक्टर जमिनी देण्यात येतील असे आश्वासन शासनाकडून नेहमी दिले जाते. मात्र प्रत्यक्षात कोणतेही कार्यवाही किंवा प्रत्यक्ष पुनर्वसन होताना दिसून येत नाही. यामुळे .../२

## १ कोटी १४ लाखाचा दरोडा टाकल्याप्रकरणी आरोपींना शिक्षा

### सुधागडात आरोपींनी व्यापाऱ्यांवर केला होता सशस्त्र हल्ला

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील पाली पोलिस स्टेशनच्या हद्दीतील मौजे धोंडसे गावच्या हद्दीत दळवी फार्महाऊस येथे दरोड्याचा गुन्हा दि.१५ मार्च २०१६ रोजी सायंकाळी घडला होता. या गुन्ह्यात १ कोटी १४ लाखाचा दरोडा टाकल्याप्रकरणी आरोपीना शिक्षा ठोठावण्यात आली आहे. माणगाव सत्र न्यायालयाने हा महत्वपूर्ण निकाल दिला आहे.

या प्रकरणातील रमेश भिकमचंद परमार व इतर चार व्यापारी असून आरोपी क्र.१ विनोद विष्णू गुडेकर व इतर आठ या आरोपींपैकी हरीचंद्र गुडेकर याने सोन्याचे देवाणघेवाण करण्याचा व्यवहार करण्यासाठी सोन्याच्या बदल्यात रोख रक्कम देण्याचे ठरवले, यातील आरोपींनी आपसात कट रचून रमेश भिकमचंद परमार आणि साक्षीदार हे सोन्याच्या खरेदीसाठी आले असता त्यांना आरोपींनी घातक शस्त्राने मारहाण करून त्यांना गंभीर व साध्या दुखापती करून पिस्तुलचा धाक दाखवून त्यांचे हातपाय रस्सीने बांधून त्यांच्याकडील रोख रक्कम १ कोटी १४ लाख रुपये आणि सोन्याची चैन, हातातील घड्याळ व मोबाईल फोन गाड्यांच्या च्याव्या काढून घेऊन रूममध्ये बंद करून दरोडा टाकला होता. या घटनेने पाली परिसरात खळबळ उडाली होती. सदर घटनेची फिर्याद पोलिसांनी घेतली असून भारतीय दंड विधान संहिता कलम ३९५, ३९७, १२० ब सह भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे, या गुन्ह्याचा तपास पाली पोलीस निरीक्षक अशोक पवार यांनी केला असून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले, सदर खटल्याची सुनावणी सत्र न्यायालय माणगाव येथे .../२

# जेता की प्यादे?

सध्या स्थगितच असलेले तीन कृषी कायदे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या नेहेमीच्या शैलीत अनपेक्षितपणे रद्दबातल केले आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी म्हणून जे कायदे आपण केले आहेत, ते काय वाट्टेल ते झाले तरी मागे घेणार नाही, ही राजकीय इच्छाशक्ती केंद्र सरकार का दाखवू शकले नाही, या प्रश्नाची चर्चा करावी लागेल. त्याच प्रकारे, हे कृषी कायदे जोवर 'जिवंत' आहेत; तोवर देशातल्या विरोधकांच्या राजकारणाला ते कितपत खतपाणी घालत राहतील, हाही मुद्दा होता. थोडक्यात, शेतकऱ्यांचे सर्वांगीण हित हा मुद्दा कृषी कायद्यांवरील गंभीर चर्चेतून मागेच गायब झाला होता. या प्रश्नाचे पुरते राजकियीकरण झाले होते. हे कायदे मागे घेतले नसते, तर संसदेच्या हिवाळी अधिवेशनात त्याचे प्रत्यंतर आले असते. अजूनही येऊ शकते. राष्ट्रपतींच्या मान्यतेची मोहोर उमटलेले हे कायदे जोवर संसदेत प्रत्यक्ष मागे घेतले जात नाहीत, तोवर आंदोलनाची अधिकृत इतिश्री करणार नाही, असे शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी म्हटले आहेच; मात्र पंतप्रधानांच्या घोषणेने या आंदोलनाचे प्रयोजन संपले आहे. या आंदोलनाच्या आश्रयाने राजकीय आंदोलनाच्या ज्वाळा पेटत्या ठेवणाऱ्यांच्या स्वप्नांवरही स्वाभाविकच पाणी पडले आहे. त्यांना आता शेतकऱ्यांचे प्रश्न विसरून, वेगाने नवा दारुगोळा जमा करावा लागेल. शिखांचे पहिले गुरू नानकदेव यांच्या जयंतीचा मुहूर्त पंतप्रधानांनी 'कायदेमुक्ती'साठी साधला असला, तरी पंजाबचे माजी मुख्यमंत्री अमरिंदरसिंग यांच्या राजीनाम्यानंतर या साऱ्या प्रक्रियेला वेग आलेला दिसतो. शेतकऱ्यांच्या राजधानीतील आंदोलनात प्रामुख्याने उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाब या तीन राज्यांमधील शेतकरी अग्रभागी होते. या तिन्ही राज्यांमध्ये शीख व हिंदू जाट शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे आहे. शरद जोशी यांच्या काळापासूनच भारतातील शेतकरी आंदोलनावर जाटांचा निर्णायक प्रभाव आहे. तो आजवर कुणालाही कमी करता आलेला नाही. भारतीय जनता पक्ष हा आजही प्रामुख्याने उत्तर भारतीय आहे. वरील तीन राज्यांचा प्रभाव म्हणता म्हणता साऱ्या हिंदी पट्ट्यावर पडू शकतो. तसे पूर्वी अनेकदा झाले आहे. भारतीय निवडणुकांचा इतिहास पाहिला, तर साऱ्या उत्तर भारताला एकेका राजकीय लाटेने कवेत घेतल्याचे दिसेल. या लाटेची संभाव्य निर्मिती मोदींनी या निर्णयाने आज तरी थोपवून धरलेली दिसते. काँग्रेसचा राजीनामा दिल्यानंतर अमरिंदरसिंग सातत्याने 'कृषी कायदे असेपर्यंत भाजपशी सहकार्य नाही' असे म्हणत होते आणि त्याच वेळी मोदी, अमित शहा आणि अजित डोवाल यांना वारंवार भेटतही होते. कायदे रद्द करण्याची घोषणा मोदींनी करताक्षणी अमरिंदर यांची भाषा बदलली. येत्या काही दिवसांत पंजाबमधील नव्या राजकीय समीकरणांना वेग येईल. पंजाबपुरता विचार केला, तर राज्याची नाजूक भौगोलिक स्थिती, आंदोलनात खलिस्तानी घुसले आहेत का ही शंका आणि पंजाबमधील अमली पदार्थांचा सुळसुळाट हे मुद्देही होतेच. 'कायदेमुक्ती'चा मुहूर्त म्हणूनच लक्षणीय आहे. लवकरच विधानसभा निवडणुकांचा जो फेरा सुरू होणार आहे, त्यात पंजाब, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, गुजरात, हिमाचल, मणिपूर आणि गोवा ही सात राज्ये आहेत. लोकसभेचे १३२ खासदार येथून येतात. यात ८० जागांचा उत्तर प्रदेश सर्वांत महत्त्वाचा. शेतकरी आंदोलनाचा उत्तर प्रदेशाच्या जाटबहुल पश्चिम भागात मोठा प्रभाव होता आणि चरणसिंह यांचे नातू जयंत चौधरी हे या कृषी कायद्यांमुळे आज, म्हणजे शनिवारीच समाजवादी पक्षाशी युतीची घोषणा करणार होते. आता ती होते का, हे पाहावे लागेल. या सगळ्या राजकारणातून देशातील सर्वसामान्य शेतकऱ्याचे हित झाले की अहित, हा लाखमोलाचा प्रश्न मात्र अनुत्तरितच राहणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने यंदा १२ जानेवारीला या कायद्यांना स्थगिती दिल्यामुळे, तसे ते 'ना मृत, ना जिवंत' असेच होते. न्यायालयाने नेमलेल्या समितीने काय अहवाल दिला आहे आणि केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला बंद लिफाफ्यात आपली काय बाजू सादर केली आहे, या दोन्ही गोष्टी आता जवळपास निरर्थक ठरणार आहेत. हे कायदे संसदेत होऊनही 'फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'ने २०२०-२१ या वर्षात खरेदी केलेल्या गहू आणि तांदळाची किंमत दोन लाख ५३ हजार २७४ कोटी रुपये आहे. डाळी, कापूस, तेलबियांची किंमत ५० हजार कोटींपेक्षा जास्त आहे. या रकमा छोट्या नाहीत. नव्या कायद्यांनीही या रकमा शेतकऱ्यांच्या हातात जाणे थांबणार नव्हते; मात्र ही सारी चर्चाच तूर्त अर्थहीन झाली आहे. भारतात उदारीकरणाचे पर्व कृषिक्षेत्राच्या अंगावरून तसेच निघून गेले होते. ती संधी पुन्हा दुरावली आहे. भारतीय राजकारणाच्या रणांगणात भारतीय शेतकरी पुन्हा एकदा जेता नव्हे, तर प्यादे ठरला आहे!

# आगरी समाजाच्या ३२ गावांवर तिसऱ्या मुंबईची कुऱ्हाड

## सिडकोच्या खोपटा नवे नगरच्या प्रकल्पाने होणार स्थानिक भूमीपुत्र हद्दपार

**दै.रायगड नगरी । उरण**

गेल्या तेरा वर्षांपासून रखडलेल्या तिसऱ्या मुंबईच्या विकासाचा मार्ग नुकताच शासनाने मोकळा केल्याने खोपटा विभागातील आगरी समाजाच्या ३२ गावांवर विनाशाची कुऱ्हाड कोसळणार आहे.

मुंबईतील लोकसंख्येच्या दाटीला पर्याय म्हणून नवी मुंबईचा विकास करण्यात आला. आता नवी मुंबईतील वाढत्या लोकसंख्येला पर्याय म्हणून तिसऱ्या मुंबईचा विकास करण्याचा घाट घातला आणि तसा निर्णय शासनाने ३ एप्रिल २००८ रोजी घेतला होता. त्याची मुहूर्तमेढ रोवण्याच्या हालचाली नुकत्याच गतिमान झाल्या आहेत.

तिसरी मुंबई ही उरण आणि पनवेल तालुक्यात उभी केली जात आहे. उरण तालुक्यातील विंधणे, जुई, चिखली-भोम, भोम, हरिश्चंद्र पिंपळे, बोरी बीके, बोरीचा कोठा, धस-खसी, चिरनेर, कळंबुसरे, कोप्रोली, बांधणपाडा, कोचरेपाडा, तळबंदखार, पिरकोन, सांगपालेखार, गोवठणे, पाले, सारडे, वशेणी, पुनाडे, जुई-पुनाडे, अंतराबामखार, कडापे, आवरे तर पनवेल तालुक्यातील कर्नाळा, बारापाडा, दिघाटी, केळवणे, साई, कासारभट, डोलघर या गावांचा समावेश आहे.

शासनाने या ना त्या कारणाने मुंबईच्या सात बेटांवरील ५२ खेड्यातील जमिनी, मिठागरे संपादित करुन आगरी माणसाला विस्थापित केले. त्यानंतर नव्या मुंबईतील ९५ गावांतील जमिनी संपादित करुन येथील आगरी-कोळी समाजाला विस्थापित केले. आता तिसऱ्या मुंबईच्या माध्यमातून उरण पूर्व भागासह पनवेलच्या सात गावांवर स्कायलॅब कोसळावी तसा महाकाय विकास होऊ घातला आहे. याच पाठोपाठ नैनाच्या रुपाने रायगड, ठाणे जिल्ह्यातील २२४ गावांमध्ये विकासाची चक्र गतिमान करण्यासाठी सरकारी यंत्रणा सज्ज आहेत. सरकार एवढ्यावरच थांबलेला नाही तर अलिबाग, रोहा, मुरुड, श्रीवर्धन या तालुक्यातील ४० गावांमध्ये स्वप्न नगरी उभी करण्याची स्वप्न पाहू लागले आहे.

या सगळ्या प्रकारातून एक दिसून येते की, राज्यकर्त्यांना फक्त आगरी समाजाच्याच घरादारांवर नांगर फिरवून त्यांना देशोधडीला लावायचे आहे. आतापर्यंत सर्वात विस्थापित झालेला कुठला समाज असेल तर तो एकमेव आगरी समाज आहे. आणि आपल्या मायभूमीतून आगरी समाज नामशेष होत असतांना, त्याचं अस्तित्व संपून चाललं असताना, आगरी माणूस उध्वस्त होत असतांना आमचे पुढारी मात्र ब्र देखील काढायला तयार नाहीत. त्यांच्या नाकर्तेपणामुळेच आगरी समाज एकटा पडला आहे. समाजाला असंघटित ठेवून राजकीय पोळ्या तेवढ्या शेवटल्या जात आहेत. संघटित शक्ती उभी राहिली असती तर शासनकर्ताची काय बिशाद होती हम करेसो निर्णय घेण्याची. पण आम्ही देखील या गोष्टीला तितकेच कारणीभूत आहोत. आम्ही अस्तित्वाचा विचार करायला तयार नाहीत. फक्त चर्चा करतो. करणाऱ्याचे पाय ओढतो. पुलाखालून पुष्कळसे पाणी वाहून तरी आमचे नेत्यांना काही फरक पडत नाही. पण दुःख या गोष्टीचं वाटतंय उद्या मात्र बिचाऱ्या सर्वसामान्य समाज बांधवांची अकारण झोप उडणार आहे. ते आपल्या मायभूमीतून बेदखल होणार आहेत. म्हणून म्हणतो माझ्या तमाम समाज बांधवांनो संघटित व्हा. आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करायला सज्ज व्हा आणि आपलं अस्तित्व टिकवा अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त करत समाजाला संघटित होण्याचे आवाहन सूर्यकांत पाटील राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्था यांनी केले आहे.

# सुतारवाडीत ३ लाख ६२ हजार रुपयांना गंडा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

सुतारवाडी नाक्यावर एक भामटा आला, काही दिवस तेथे वास्तव्य केले अनेकांना आपल्या गोडवाणीने आपल्या जाळ्यात अडकविले आणि लाखो रुपये तसेच किराणा माल घेवून कोणासही थांगपत्ता न लागता या सराईत भामट्याने दूसरे ठिकाण गाठल्याने या ठिकाणी चर्चेचा विषय झाला आहे. याबाबत अज्ञात इसमाबाबत संबंधितांनी कोलाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी सुतारवाडी नाक्यावर एक व्यक्ती काही दिवसांपूर्वी भाड्याने खोली घेवुन वास्तव्य करत होती. तेथे वास्तव्यास आल्यानंतर त्याने अधिक विश्वास संपादन करण्यासाठी सुतारवाडी येथे सत्यनारायणाची पुजा घालून पूजेसाठी अनेकांना निमंत्रण ही दिले होते. त्यावेळी त्यांने अनेकांची मने जिंकली आणि भूल-थापाना अनेकांना आपल्या जाळ्यात अडकविले मी पुणे जिल्हयाचा सर्वेक्षण अधिकारी आहे. रायगड जिल्हयात दोन लेखनिकाच्या जागा रिक्त आहेत त्या भरावयाच्या आहेत त्यासाठी रु. २ लाख दिले तर काम नक्की होईल असे सांगून एका व्यक्तीकडून २ लाख रुपये उकळले. एवढेच नाही तर एका दुकानदारा कडून १ लाख ६२ हजार रुपयांचा किराना सामान आणि रोख रक्कम घेवून सुतारवाडी येथून पलायन केले. हा भामटा उस्मानाबाद येथील असल्याचे समजते. नोकरीचे अमिष दाखवत या जिल्हयातून दुसऱ्या जिल्ह्यात नंतर तेथून आणखी कोठे तरी जावून तिथे आपल्या मधुर वाणीने गंडा घालणे असे सर्रासपणे प्रकार सध्या ठिक ठिकाणी सुरु आहेत. बेकारीमुळे अनेकांना नोकऱ्या नाहीत. याचा फायदा सराईत भामटे घेत आहेत. अशांच्या मुसक्या आ-वळून त्यांना योग्य ती शिक्षा ठोठावली पाहिजे. ज्यांची फसवणूक झाली आहे त्यांची रक्कम त्यांना मिळवून दिली तर ज्याने व्याजाने रक्कम काढून नोकरीसाठी दिली असेल तर त्या व्यक्तीस दिलासा मिळेल. मात्र सुतारवाडीत येऊन भोळ्या भाबड्या माणसांना गंडा घालणाऱ्या व्यक्तीची चर्चा नाक्यावर खंमगपणे चालू आहे. अनोळखी व्यक्तीवर कोणीही लगेच विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# रिलायन्स प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नासंदर्भात झालेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत सकारात्मक चर्चा

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

रिलायन्स (पूर्वीची आयपीसीएल) प्रकल्पग्रस्तांच्या नोकरी व इतर मागण्यांसाठी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात १८ नोव्हेंबरला सायंकाळी जिल्हा प्रशासन, रिलायन्स व्यवस्थापन व प्रकल्पग्रस्तांचे शिष्ट मंडळ यांच्यात झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती प्रकल्पग्रस्तांचे स्थानिक नेतृत्व गंगाराम मिणमिणे यांनी दिली. प्रकल्पग्रस्तांना कशाप्रकारे न्याय देता येईल यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी रिलायन्स व्यवस्थापनाकडून १५ दिवसांत प्रस्ताव मागितला आहे. त्यानंतर लगेच एक बैठक आयोजित करून त्यामध्ये हा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे पुढील बैठकीतील चर्चेतून एक चांगला निर्णय येईल अशी अपेक्षा असून रिलायन्स प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळणारच असा विश्वासही प्रकल्पग्रस्तांच्या लढ्याचे नेतृत्व करणारे वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केला असल्याची माहिती गंगाराम मिणमिणे यांनी दिली.

अलिबाग येथे रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर, रोहाचे प्रांताधिकारी डॉ. यशवंतराव माने, पेणचे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, रोहा तहसीलदार कविता जाधव, पेण तहसीलदार स्वप्नाली डोईफोडे, रिलायन्सचे वरिष्ठ अधिकारी विनय किर्लोस्कर, आनंद देशपांडे, रमेश धनावडे, प्रकल्पग्रस्तांचे स्थानिक नेतृत्व गंगाराम मिणमिणे, कृष्णा दाभाडे, राकेश जवके, रोशन जांबेकर, संजय कुथे, रूपा भोईर आदींसह संबधित खात्याचे इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते.

चोळे ते नागोठणे परिसरातील भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेने वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनच्या माध्यमातून रिलायन्सच्या ५४७ प्रकल्पग्रस्त कामगारांना नोकरी व अन्य मागण्यांसाठी रिलायन्स व्यवस्थापनाविरोधात हा लढा सुरु केला आहे. याच लढ्याचा एक भाग म्हणून वंचित बहुजन आघाडीकडून १५ नोव्हेंबर रोजी रिलायन्स कंपनीचे गेट रोको आंदोलन छेडले होते. मात्र यावेळी पोलिसांनी प्रकल्पग्रस्त आंदोलकांची धरपकड केली होती.

त्याबद्दल वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी नाराजी व्यक्त केली. आंदोलन होत असतांना आंदोलकांची धरपकड होणे हे चुकीचे आहे. त्यांनी लोकांशी व्यवस्थित वागावे. यासंदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षकांशी माझे बोलणे झाले असून ज्या काही चुका आमच्याकडून झाल्या आहेत त्याची दुरुस्ती केली जाईल असे आश्वासन जिल्हा पोलीस अधीक्षकांनी वंचित बहुजन आघाडीचे आमचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांना दिल्याची माहितीही गंगाराम मिणमिणे यांनी दिली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सिग्नल तोडणाऱ्या वाहनचालकांवर पनवेल वाहतूक विभागाची कारवाई

अनेकदा सिग्नल जंपिंगचे प्रकार घडतात. तसेच भरधाव वेगाने वाहने चालवणारे रोडरोमियो पनवेल शहरात अधिक पहायला मिळतात. त्यामुळे अशा वाहनचालकांवर वाहतूक विभागाने सातत्याने कारवाई करावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे यासाठी पनवेल शहर वाहतूक विभागामार्फत सिग्नल मोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत आहे. मागील ५ दिवसांपासून पनवेल शहरात सिग्नल जंपिंग ड्राइव्ह सुरू असून आतापर्यंत एकूण साधारण १७२ कारवाया करण्यात आल्या आहेत. तर सिग्नल तोडणाऱ्या ११४ वाहनचालकांचे लायसन्स तीन महिन्यांसाठी निलंबित करण्यात आले आहेत. याचबरोबरीने स्टॉप लाईनच्या ७३ कारवाया करण्यात आल्या असून ३७ प्रस्ताव आरटीओकडे पाठवण्यात आले आहेत. या कारवायांमुळे वाहनचालकांनाही काही काळ वाहतुकीची शिस्त लागली असल्याने याबाबत नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

## देशातील शेतकरी आंदोलनामुळे मोदी सरकार बॅकफुटवर : महेंद्र घरत

या अन्याया विरुद्ध प्रखर आंदोलन सुरू केले.हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी मोदी सरकारने अनेक अनन्वित अत्याचार करूनही शेतकऱ्यानी गेले वर्षभर हे आंदोलन सुरूच ठेवून मोदी सरकारला हैराण केले.

शेती व्यवस्था उध्वस्त करणाऱ्या या अन्याय्य कायद्यांविरोधात शेतकऱ्यांनी सुरू केलेल्या आरपारच्या लढाईला काँग्रेस पक्ष पक्षाध्यक्ष राहुल गांधी यांनी सुरुवाती पासूनच पाठबळ दिले आहे.काँग्रेस पक्षाने केंद्रात सत्ता असताना कोणताही शासकीय प्रकल्प भांडवलदारांच्या घशात घालण्याचे पाप केले नाही.त्याचबरोबर शेतकरी व शेती व्यवसायाला नेहमीच प्राधान्य दिल्याने ग्रामीण भागात काँग्रेसची पाळेमुळे अजूनही घट्ट असल्याचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी स्पष्ट केले. या आंदोलनात सुमारे ७०० शेतकऱ्यांनी बलिदान केले असून त्यांच्या या त्यागापुढे अखेर मोदी सरकारला झुकावे लागून ते अन्याय्य कायदे अखेर मागे घ्यावे लागले.हा शेतकऱ्यांच्या असीम त्यागाचा विजय असल्याचे महेंद्र घरत यांनी स्पष्ट केले आहे.

कृषिप्रधान भारत देशात शेतकऱ्यांचे हित जपलेच गेले पाहिजे असे सांगून शेतकऱ्यांच्या मुळावर येणाऱ्या सरकारविरोधात काँग्रेस पक्ष नेहमीच अग्रेसर राहील असे सांगून रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी मोदी सरकारला बॅकफूटवर नेणाऱ्या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनाचे अभिनंदन केले आहे.उरण काँग्रेस कार्यालयात झालेल्या या पत्रकार परिषदेत महेंद्र घरत यांच्यासह जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, महिला काँग्रेस तालुकाध्यक्षा रेखा घरत,विधानसभा महिला काँग्रेस अध्यक्षा संध्या ठाकूर,मच्छिमार नेते मार्तंड नाखवा,अकलाख शिलोत्री, कमलाकर घरत,सदानंद पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांचा इशारा

हनुमान कोळीवाडा येथील ग्रामस्थ, मच्छिमार बांधव कोळी बांधवांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. शासन दरबारी, विविध शासकीय विभागात गेली ३७ वर्षे पत्रव्यवहार,संप, आंदोलने, साखळी उपोषण करूनही हा प्रश्न सुटत नसल्याने १ डिसेंबर २०२१ रोजी जे एन पी टी च्या समुद्रात जहाजे अडवून चॅनेल बंद करण्याचा इशारा हनुमान कोळीवाडा येथील ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे.बुधवार दिनांक १७/११/२०२१ रोजी हनुमान कोळीवाडा ग्रामस्थ आणि रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्यात पुनर्वसन या विषयावर महत्वाची मिटिंग झाली मात्र यावेळेही फक्त आश्वासन मिळाले. त्यामुळे तेथेही हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांच्या पदरी निराशाच आली. पदरात मात्र काहीच पडले नाही. नरेश कोळी, मंगेश कोळी, रमेश कोळी, सुरेश कोळी, नितीन कोळी, हरेश कोळी, प्रमिला कोळी, शर्मिला कोळी, ज्योती शेवेकर, दीप्ती कोळी, स्मिता कोळी आदी कोळी बांधवांनी शासनाच्या चालढकल पणाच्या वृतीचा निषेध केला आहे. यासाठी हनुमान कोळीवाडा ग्रामस्थांनी हनुमान कोळीवाडा गावात निषेध रॅलीही काढली व १ डिसेंबर रोजी समुद्रात जहाजे अडवून चॅनेल बंद आंदोलनाचा इशारा या रॅलीतून प्रशासनाला दिला आहे.

## १ कोटी १४ लाखाचा दरोडा टाकल्याप्रकरणी आरोपींना शिक्षा

करण्यात आली. सदर खटल्यात सहायक सरकारी वकील जितेंद्र म्हात्रे, सहायक शासकीय अभियोक्ता यांनी सरकार पक्षाच्या वतीने साक्षीदार तपासले व न्यायालयासमोर प्रभावीपणे युक्तिवाद केला. तसेच सदर कामकाजात पैरवी अधिकारी, यु एल धुमास्कर, छाया कोपनर, शशिकांत कासार, पो ह ९१३ शशिकांत गोविलकर, सुनील गोळे, पो. शि सोमनाथ ढाकणे यांनी मदत केली. अभियोग पक्षाने कोर्टासमोर प्रभावीपणे केलेला युक्तिवाद आणि साक्षी पुराव्या वरून न्यायाधीश मा. एन एस कोल्हे, यांनी सदर घटनेतील गुन्ह्याचे आरोपी विष्णू गुडेकर व संतोष महाडिक यांस दोषी ठरवून दि.१९ नोव्हेंबर २०२१ रोजी भारतीय दंड विधान कलम ३९५ अन्वये ६ वर्ष सक्त मजुरी व रुपये पाच हजार दंड ठोठावण्यात आला आहे, तसेच दंड न भरल्यास तीन महिने साधी कैदेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. व उर्ववित आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांना संप मागे घेण्याचे ना.अनिल परब यांचे आवाहन

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात सुरू असलेल्या एसटी कामगारांच्या आंदोलनाचा तिढा अद्याप कायम आहे. आज झालेल्या चर्चेच्या फेरीनंतरही एकटी कामगारांचा संप कायम आहे. दरम्यान, परिवहन मंत्री अनिल परब यांनी एसटी कामगारांना संप मागे घेण्याचे आवाहन केले असून, एसटी संघटनांच्या प्रतिनिधींनी सांगितल्या प्रमाणे मी राज्याच्या महाधिवक्त्यांशीही बोलणार आहे, असे सांगितले. तसेच एसटीच्या विलिनीकरणाची प्रक्रिया ही एक-दोन दिवसांमध्ये होणारी नाही, असेही अनिल परब यांनी स्पष्ट केले.



गेल्या १०-१२ दिवसांपासून एसटी कर्मचाऱ्यांचा राज्यव्यापी संप सुरू आहे. दरम्यान आज या संपावर तोडगा काढण्यासाठी एसटी संघटनेचे पदाधिकारी गुजर आणि वकील गुणरत्न सदावर्ते यांनी परिवहन मंत्री अनिल परब यांची भेट घेऊन चर्चा केली. मात्र त्यामधूनही तोडगा निघाला नाही.

या चर्चेबाबत माहिती देताना अनिल परब यांनी सांगितले की, कोर्टाने दिलेल्या निर्णयामध्ये फेरबदल करता येत नाही. तसेत समितीचा जो काही अहवाल असेल, त्यावर आम्ही सकारात्मक निर्णय घेऊ असे मी या प्रतिनिधींना सांगितले. दरम्यान या चर्चेवेळी पदाधिकाऱ्यांनी महाधिवक्त्यांशी चर्चा करण्याचे आव-ाहन केले होते, त्यानुसार मी राज्याच्या महाधिवक्त्यांशी बोलणार आहे, मात्र एसटी कर्मचाऱ्यांनी संप मागे घ्यावा, असे आवाहन परब यांनी केला.

एसटीच्या लांबलेल्या संपामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. त्यांना त्रास सहन करावा लागत आहे. विलिनिकरणाचा निर्णय आणि विलिनिकरणाची प्रक्रिया एक-दोन दिवसांत होत नाही. त्याबाबत निर्णय घेण्यासाठी कमिटीला वेळ देण्यात आली आहे. त्या वेळेत काम होईल, असेही अनिल परब यांनी सांगितले.

# तरूणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

किरकोळ वादातून आई ओरडल्याने त्याचा राग मनात धरून एक तरूणी राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता घरातून निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात देण्यात आली आहे.

प्रिती उर्फ दिदि अश्विन कांबळे (रा.-उसर्ली गाव) उंची साधाराण ५ फूट, डोक्याचे केस काळे वाढलेले, अंगाने मजबूत, चेहरा गोल, रंग गहुवर्ण, कपाळ मोठे असून तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे. तिच्या अंगात सफेद रंगाचा टॉप व ग्रे रंगाची लेगिन्स घातलेली आहे. तसेच पायात प्लॅस्टिकची गुलाबी चप्पल आहे. या तरूणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दुरध्वनी-२७४५२३३३ किंवा पोलिस नाईक एम.एम. झिने यांच्याशी संपर्क साधावा.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर पतपेढीच्या वार्षिक सभेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्य.व उच्च माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सह.पतपेढी मर्या.रोहा,जि. रायगड या संस्थेची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रवि.दि.२८ नोव्हें.स.११ वा.खारी येथे आयोजित करण्यात आली आहे.

या सभेप्रसंगी मागील सभेचे प्रोसेडिंग वाचून त्यास मंजूरी देणे,दि.३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद, तेरिज व नफा तोटा पत्रक यास मंजुरी देणे,सन २०२१/२२ या आर्थिक वर्षासाठी लेखा परिक्षक नेमणेबाबत,कर्ज मर्यादा वाढ मंजूरीबाबत,कायमनिधी सुरू करणेबाबत, सन २०२०/२१ ऑडिट रिपोर्ट मंजूरी करणेबाबत, गट विमा उतरविणे व विद्यार्थी गुणगौरव तसेच सेवानिवृत्त सभासद सन्मान करणे व अध्यक्षतांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय आदी विषयावर आदी विषयांवर चर्चा करण्यात येणार असून या सभेला जास्तीत जास्त सभासदांनी उपस्थित राहण्याचे अवाहन करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# वाहतूक पोलिसांच्या कारवाईमुळे जेएनपीटी बंदर परिसरातील रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी बंदर परिसरात रस्त्यावर उभ्या करण्यात येणाऱ्या अवजड कंटेनर ट्रेलरमुळे मोठ्या वाहतूक कोंडी होत आहे.ही वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक निरज चौधरी यांनी रस्त्यावर उभ्या करण्यात येणाऱ्या अवजड वाहनांवर कायदेशीर ऑनलाईन दंडात्मक कारवाईचा बडगा उगारल्याने बंदर परिसरातील रस्त्यांवर बेकायदेशीरपणे उभी असलेली वाहने हटविल्याने जेएनपीटी बंदर परिसरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे.



जेएनपीटी बंदरात आयात – निर्यातीसाठी मालवाहतूक करणाऱ्या अवजड कंटेनर ट्रेलर चालकांना पार्किंगची व्यवस्था नसल्याने ही वाहने रस्त्यावरच उभी केली जात आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी ही समस्या नित्याची झाली आहे.मात्र वाहतूक पोलिसांनी कालपासून जेएनपीटी बंदरातील रस्ते मोकळे करण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्यामुळे बंदराकडे जाणाऱ्या वाहनांना मार्गक्रमण होण्यासाठी सोयीचे ठरत आहे. जेएनपीटीने सुरू केलेल्या पार्किंगचे दर सामान्य ट्रेलर वाहतूक चालकांना परवडणारे नसल्याने ते पर्यायी मार्ग आणि पैसे वाचविण्यासाठी रस्त्याच्या बाजूला वाहने पार्किंग करीत आहेत.

मात्र जेएनपीटी महामार्गाच्या दोन्ही बाजूला अधिक प्रमाणात वाहने उभी केल्यास वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. जेएनपीटी बंदरात जेएनपीटीसह जिटीआय, एन.एस. आय.सी.टी. व भारत मुंबई कंटेनर टर्मिनल्स अशी चार बंदरे कार्यरत असतांना मात्र तेच रस्ते व त्यामध्ये काही प्रमाणात उड्डाण पुलांमुळे झालेला बदल यात वाहतुक करणाऱ्या चालकांना विशेष अशी मोकळीक मिळालीच नाही. याशिवाय या परिसरात वाहनचालकांची कोणत्याही प्रकारचे स्वच्छता गृहाची व्यवस्था जेएनपीटी प्रशासनाने केलेली नाही. त्यामुळे रस्त्यात उभ्या करण्यात येणाऱ्या कंटेनर ट्रेलर चालकांना कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागत आहे.

# संक्षिप्त...

## दिव्यांग प्रमाणपत्र काढण्यासाठी खबरदारी घेण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । उरण**

जे दिव्यांग बांधव दिव्यांग प्रमाणपत्रा पासून वंचित आहेत आणि जे दिव्यांग अलिबाग येथे महाराष्ट्र शासनाचे जुने दिव्यांग प्रमाणपत्र जमा करून नवीन दिव्यांग प्रमाणपत्र काढण्यासाठी जातील.त्यांनी अलिबाग येथे जाताना पहिली खबरदारी घेण्याची आहे ती म्हणजे १) सर्व कागदपत्रे ऑनलाईन करून घेणे (जमत नसल्यास उमेश पाटील, संदेश राजगुरू, महेंद्र म्हात्रे यांच्याशी संपर्क साधने) २) स्वतचे दोन कलर फोटो, ३) नवीन व जुने असल्यास सुद्धा रेशनकार्ड, आधार कार्ड व पहिला काढला असल्यास जुना दिव्यांग प्रमाणपत्र हि सर्व ओरीजनल कागदपत्रे घेऊन जावे.अलिबाग येथे जेवढ्या लवकर जाता येईल तेवढे लवकर जाने कारण तेथे फक्त १०० दिव्यांग व्यक्तींनाच घेण्यात येतो. तसेच तेथे गेल्यानंतर पहिले केस पेपर साठी लाईन मध्ये उभे राहणे. नाहीतर दिव्यांगाना नंबर मिळणार नाही आणि दिव्यांग बांधवांची फेरी फुकट जाणार. केस पेपर मिळाल्यानंतर दिव्यांगाची तपासणी होणार.तपासणी झाल्यानंतर दिव्यांग बांधवाला पुन्हा दुसरे डॉक्टर तपासतील (व्हेरिफाईड) करतील. त्यांनतर दिव्यांगाचे ओरीजनल रेशनकार्ड वर शिक्का मारून दिव्यांग बांधवांना नवीन दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात येईल. यामध्ये तेथे एजंट आहेत. कोणीही एजंट कडे जाऊ नये त्याने दिव्यांग बांधवांचा काहीही फायदा होत नाही. फक्त पैसे जातील. कारण दिव्यांग प्रमाणपत्र हा १०० दिव्यांग तपासणी झाल्यानंतर ५.०० ते ५.३० वाजल्यानंतर देण्यात येतो.अलिबाग येथे अस्थिव्यंगसाठी बुधवार व मानसिकसाठी गुरुवार आहे.तरी दिव्यांग बांधवांनी या सर्व गोष्टीची खबरदारी घ्यावे असे आवाहन बेरोजगार अपंग जीवन विकास समाज कल्याण संस्था उरणचे अध्यक्ष योगेश पाटील, उपाध्यक्ष महेंद्र म्हात्रे, सेक्रेटरी –श्रीकांत पाटील, खजिनदार –उमेश पाटील यांनी दिव्यांग बांधवांना केले आहे.

## 3 लाखांची रोकड केली लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तीन लाखांची पिशवी घेऊन गाडीकडे पायी जात असताना दोन अज्ञात इसमांनी मोटारसायकलवरून पाठीमागून येऊन रोखरक्कम असलेली पिशवी लंपास केल्याची घटना शहरातील बँक ऑफ महाराष्ट्र समोरील कर्नाळा भाजी मार्केट परिसरात घडली आहे.

गोपीचंद ठाकूर (वय–५४) हे त्यांच्या मित्रासोबत फोनवर बोलत त्यांनी उभी करून ठेवलेल्या गाडीकडे रोखरक्कम घेऊन पायी जात असताना दोन अज्ञात इसमांनी मोटारसायकलवरून पाठीमागून येऊन रोखरक्कम असलेली पिशवी लंपास केल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ग्यारहवीं शरीफ उत्सव हाळ बुद्रुकमध्ये साजरा

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खालापूर तालुक्यातील हाळ बुद्रुक गावात ग्यारहवीं शरीफ (उर्स ) मंगळवार दि.१६ नोव्हेंबर रोजी रात्री साजरा करण्यात आला. गौसपाकच्या ग्यारहवीं शरीफमध्ये कुराण व नात शरीफचे वाचन करीत रातीबचे कार्यक्रम पार पडल्यानंतर नियाज, संडलचे वाटप करण्यात आले.

याबाबत कथा अशी की, हजरत गौसपाक शिक्षण घेण्यासाठी जिलानवरून बगदादला येण्यासाठी पायी प्रवास केला. आपण लहान असतांना आईने खर्चासाठी ४० दिनार (रुपये) दिले होते. जाता जाता त्यांना वाटेत ६० डाकूंनी ताफ्याला अडवून लुटले. डाकूने कोणालाही सोडले नाही आणि सर्वांचे सामान, पैसे लुटले. गौसपाक लहान असल्याने कोणीही त्यांना तपासले नाही. एखादा दरोडेखोरांनी गौसपाकला विचारले की तुझ्याकडे काही आहे का त्यांनी उत्तर दिले की ४० दिनार (रुपये) आहेत. असाच प्रकार आणखी एका दरोडेखोराच्या बाबतीत घडला. गौसपाक ने लुटारु सरदारला ४०दिनार (रुपये) दिले व तिथून प्रवासाला निघताना म्हणाले, माझ्या आईने संगितले होते की प्रत्येक परस्थितीत नेहमी खरे बोला. म्हणूनच मी दिनार गमावण्यास सहमत आहे, परंतु माझ्या आईच्या शब्दाचा विरुद्ध जाणे मला आवडत नाही.



गौसपाकच्या शब्दांचा इतका प्रभाव पडला की सरदारासह सर्व डाकू आपल्या पापांपासून दूर राहिले आणि धार्मिक लोक बनले. गौसपाकने शिक्षण प्राप्त करण्यासाठी झाडाची पाने खावून, पोटाला दगड बांधून शिक्षण प्राप्त केला. संपूर्ण आयुष्य त्यांनी अल्लाहची इबादत व लोकांच्या सेवेत दिला. लहान असतानाच त्यांनी दूध न पिता रमजानचे रोजे ठेवले. संपूर्ण रात्र ते नमाजमध्ये पूर्ण कुराण वाचन करायचे. अल्लाहने त्यांना सर्व पीरांचे (वली) सरदार बनविले आहे. गौसपाक आपल्या जीवनातील संकटांना तोंड देत अपयशाच्या शिखरावर पोहोचले. त्यांनी विलायतमध्ये असे स्थान मिळवले जे इतर कोणीही मिळवू शकले नाही, म्हणूनच गौस–ए–आझम म्हणाले माझे हे पाऊल अल्लाहच्या प्रत्येक अवलियाच्या गळ्यातले आहे. त्यामुळे त्यांना बडे पीर दस्तगीर या नावाने ही ओळखले जातात. उर्दू तारखेनुसार रबीऊल आखीरच्या अकरा तारखेला (ग्यारहवीं शरीफ) त्यांचा उर्स संपूर्ण जगात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यांच्या नावाने गरीब असो की आमिर जेवण (लंगर ), खिचरा, मिठी खीर, शरबत, खजूर, बुंधी, लाडू, बिस्केट, खाण्यासाठी लोकांना आमंत्रण दिले जातात.

## पर्यावरण जनजागृतीसाठी उरण ते गोवा सायकल प्रवास

**दै.रायगड नगरी । उरण**

जागतिक पर्यावरणीय प्रदूषण समस्या तसेच समुद्रामध्ये व समुद्र किनारी मोठ्या प्रमाणात असलेल्या प्लास्टिक मुळे समुद्रातील विविध जीवांना होणारा त्रास यामुळे अनेक प्रजाती नष्ट होत आहेत. त्यामुळे प्लास्टिक बंदी या महत्त्वपूर्ण विषयावर जनजागृती करण्याकरिता उरण ते गोवा समुद्र किनार्यावरुन असे ६५० किलोमीटर सायकलवरून प्रवास उरणमधील विवेक मेघश्याम भगत व रोहा तालुक्यातील सूरज शरद खांडेकर हे दोन तरुण करत आहेत. पर्यावरण विषयक जनजागृतीसाठी विवेक भगत, सुरज खांडेकर हे दोन तरुण उरण ते गोवा असा सुमारे सहाशे पन्नास किलोमीटर सायकलने प्रवास करण्याचा संकल्प केला.

त्यानुसार दिनांक १८/११/२०२१ रोजी त्यांनी उरण चारफाटा येथून प्रस्थान केला आहे. एकूण ६ दिवसाचा हा प्रवास असून २३ तारखेला ते गोव्याला सायकल वरून प्रवास करत पोहोचतील. जमले तर गोव्या पुढेही काही किलोमीटर सायकल वरून प्रवास करत दक्षिण भारत मध्ये जनजागृती करण्याचा त्यांचा मानस आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेले प्रदूषण , प्लास्टिकची समस्या यामुळे प्रदूषण विषयक जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवित असल्याचे सायकलस्वार विवेक भगत,सूरज खांडेकर यांनी सांगितले. सदर उपक्रमाचे उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार,सामाजिक कार्यकर्ते प्रशांत पाटील,उरण सामाजिक संस्थेचे सर्व पदाधिकारी सदस्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



## मासळी खवय्यांची चंगळ, पर्यटकांना मेजवानी

### मासळीची आवक वाढली, विविध प्रकारचे मासे मुबलक, भाव उतरले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पाली सुधागडसह जिल्ह्यात मासळी खवय्यांची संख्या मोठी आहे, आता नियमित बाजारात ताजी मासळी उपलब्द होतेय. त्यामुळे मासळी खरेदीसाठी खवय्यांच्या उड्या पडत आहेत. जिल्ह्यात समुद्रात सध्या मोठ्या प्रमाणात मासळी सापडत आहे. त्यामुळे मासळीची आवक वाढली आहे. परिणामी मासळीचे भाव मागील महिन्याच्या तुलनेत २० ते ३० टक्क्यांनी उतरले आहेत. ८०० ते १००० रुपये किलोने मिळणारे पाप–लेट, सुरमई व रावस आदी मासळी आता जेमतेम ६०० ते ७०० रुपये किलोने मिळत आहे. शिवाय विविध जाती व प्रकारचे मासे मिळत असल्याने खवय्यांची चंगळ झाली आहे. सध्या मोठ्या प्रमाणात येणाऱ्या पर्यटकांना देखील स्वस्तात मस्त मासळी मिळत आहे.



ओले बोंबील, मांदेली कोलंबी मोठ्या प्रमाणात मिळत असल्याने त्यांचे भाव देखील खूप उतरले आहेत. मोठ्या विश्रांती नंतर मासळीची चांगली आवक येत आहे. खोल समुद्रातील व किनाऱ्यावर मासेमारी जोरात सुरू आहे. यामुळे मासळीचे भाव उतरले आहेत. जिल्ह्यात तब्बल २४० किमी लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. त्यामुळे येथे ताजी मासळी सहज उपलब्ध होते. अनेक लोक व पर्यटक खास ताजी मासळी खाण्यासाठी येथे येत आहेत. तर येथील मासळी मोठ्या प्रमाणात मुंबई व इतर शहरात देखील जाते. असे दिवेआगर येथील माऊ रेस्टॉरंटचे चालक मनीष पाटील यांनी सांगितले. सध्या माशांची स्वस्ताई असल्याने खवय्ये व पर्यटक मोठ्या प्रमाणात मासळीचा आनंद घेत आहेत. सुरमई, रावस, टोळ, कर्ली, घोळ व पापलेट हे अधिक मागणी असलेले महागातले मासे बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहेत.

## हॉटेलमध्ये घरफोडी करून साहित्य केले लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील मुंबई ते गोवा मार्गावरील आगरी कट्टा हॉटेलमध्ये अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून जवळपास १६ हजारांचे साहित्य चोरून नेल्याची घटना घडली आहे.

अज्ञात चोरट्याने आगरी कट्टा हॉटेलच्या स्लायडिंग खिडकीच्या उघड्या दरवाज्यावाटे आत प्रवेश करून त्याठिकाणी असलेले वेल्डिंग मशिन, ग्राईंडर मशिन, ड्रिल मशिन व वेल्डिंग केबल असा मिळून जवळपास १६ हजारांचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात देण्यात आली आहे.

## लोखंडी कपाऊंड जाळीचे बंडल चोरणारे ५ जण गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील उरण नाका चिन्मय गौरांग सोसायटीमधून लोखंडी कंपाऊंड जाळीचे बंडल चोरणाऱ्या ५ जणांना पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे.

या ठिकाणी साधारण २० हजारांचे लोखंडी जाळीचे बंडल चोरीस गेल्याची तक्रार ईजाज शेख याने पनवेल शहर पोलिस ठाण्यात देताच वपोनि अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक गणेश फरताडे, हवालदार रविंद्र राऊत, पो.ना. विनोद देशमुख, पो.शि. प्रसाद घरत, विवेक पारासुर, युवराज राऊत व मिसाळ आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार याद्वारे परिसरात सखोल चौकशी करून याप्रकरणी दिनेश टकले (वय–२९, रा.–शिरढोण), राज चौधरी (वय–२१, रा.–शिरढोण), गणेश सोनार (वय–२१, रा.–शिरढोण), नरसिमा शिरनम (वय–२१, रा.–शिरढोण पाडा) व भंगार खरेदी विक्री करणारा अब्दुल खान (वय–३०, पळस्पा फाटा) या ५ आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्यातील सर्व माल हस्तगत करण्यात आला आहे. यांच्या अटकेमुळे पनवेल परिसरातील अनेक घरफोडीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.


श्री.भाकरे सो.कोर्ट

वकील एम.एस.मांगेला

**जाहीर नोटीस**

मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज क्र.१४३०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/१२/२०२१

१) श्रीमती.किरण राजाराम सावंत
२) श्री.रोहित राजाराम सावंत
३) श्रीमती.श्रीमंती सदाशिव सावंत
सर्व रा.सदनिका क्र.सी–२, १ ला मजला,
श्रीराम सोसायटी, प्लॉट नं.३९, से.५,
खारघर, नवी मुंबई — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ यांचे वडील व अर्जदार क्र.३ यांचा मुलगा मयत कै.राजाराम सदाशिव सावंत यांचा मृत्यू दि.२३/०४/२०२१ रोजी श्री हॉस्पिटल–कराड रोड, विटा येथे निधन झाले. सदर मयताचे नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**Flat No.C-2, 1 st floor, Sriram CHS, Plot No.39, Sector-5, Kharghar, Navi Mumbai**
**Valued at Rs.5,86,150/-**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदाराने वारसदाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारसदाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न घेतल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१७/११/२०२१ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



ॲड.रेणुका मि. पाटील, पनवेल
अर्जदाराचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६५७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/१२/२०२१

श्री.बीलाल अब्दुल रशिद खानबुबेरे
वय : ३० वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.मु.पो.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. खदीजा अब्दुल रशिद खानबुबेरे यांचे निधन दि.१५/०७/२०२० रोजी मु.पो.तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले असून यांची आई कै.फातीमा महमद इब्राहीम पटेल या दि.०१/०६/१९९३ रोजी मयत झालेल्या आहेत. श्री.बीलाल अब्दुल रशिद खानबुबेरे ह्यांनी कै.खदीजा अब्दुल रशिद खानबुबेरे यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| अनु क्र. | गाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तळोजा पाचनंद | २८२ | ६ | ३ | ०–१७–८ | २.६२ |
| २ | तळोजा पाचनंद | २८२ | ६ | ४ | ०–३७–८ | ६.0३ |
| ३ | तळोजा पाचनंद | ११ | २३६ | १ | ०–२३–० | ३.0 |
| ४ | ओवे | ३४३ ब | २९३ | ५ अ | ७–३०–० पोटखराब्यासहीत | १0.0४ |

वरील मिळकती ह्या कै.खदीजा अब्दुल रशिद खानबुबेरे यांच्या वडिलोपार्जित मिळकती असून श्री.बीलाल अब्दुल रशिद खानबुबेरे हे कै. खदीजा अब्दुल रशिद खानबुबेरे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.बीलाल अब्दुल रशिद खानबुबेरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.खदीजा अब्दुल रशिद खानबुबेरे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२०/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गोडसे मॅडम

अर्जदारातर्फे वकील
विवेक सदाशिव तावडे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६१८/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२२/१२/२०२१

१) श्रीमती.किर्ती प्रशांत पोमेंडकर
रुम नं.७०४, ए विंग,
साई सिद्धी को.ऑप.हौ.सोसायटी,
प्लॉट नं.१३१, काळुंद्रे,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६
२) कुमार कश्यप प्रशांत पोमेंडकर
रुम नं.७०४, ए विंग,
साई सिद्धी को.ऑप.हौ.सोसायटी,
प्लॉट नं.१३१, काळुंद्रे,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६
३) कुमारी हार्दवी प्रशांत पोमेंडकर
रुम नं.७०४, ए विंग,
साई सिद्धी को.ऑप.हौ.सोसायटी,
प्लॉट नं.१३१, काळुंद्रे,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६
४) श्रीमती.स्मिता मारुती पोमेंडकर
रुम नं.७०४, ए विंग,
साई सिद्धी को.ऑप.हौ.सोसायटी,
प्लॉट नं.१३१, काळुंद्रे,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै. प्रशांत मारुती पोमेंडकर यांचे निधन दि.०२/०४/२०२१ रोजी नेस्को जम्बो कोविड सेंटर (हॉस्पिटल), गोरेगाव, ग्रेटर मुंबई येथे झाले आणि अर्जदार १) श्रीमती.किर्ती प्रशांत पोमेंडकर २) कुमार कश्यप प्रशांत पोमेंडकर ३) कुमारी हार्दवी प्रशांत पोमेंडकर ४) श्रीमती.स्मिता मारुती पोमेंडकर रा. रुम नं.७०४, ए विंग, साई सिद्धी को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.१३१, काळुंद्रे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ यांनी या कोर्टात सदर मयत कै.प्रशांत मारुती पोमेंडकर यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**अ) (स्थावर मिळकती) रुम नंबर : ७०४, ए विंग, साई सिद्धी को. ऑ.हौ.सोसायटी, प्लॉट नंबर : १३१, काळुंद्रे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६**

**आ) (जंगम मिळकती) खाते क्र.३६२३७३४३०७८, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा–पनवेल, ओ.एन.जी.सी. मधील रक्कम रुपये–६२,०१०/– (रुपये बासष्ट हजार दहा फक्त)**

**इ) (जंगम मिळकती) खाते क्र. : २२५११२१६७१४, स्टँण्डर्ड चार्टर्ड बँक, शाखा–कोर्ट, पत्ता : २३–२५, एम.जी.रोड, फोर्ट, वि.एस.एन.एल. च्या समोर, मुंबई ४००००१ मधील रक्कम रुपये ७,२४,२२४/– (रुपये सात लाख चोवीस हजार दोनशे चोवीस फक्त)**

कै.प्रशांत मारुती पोमेंडकर यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारसा दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२०/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

